# श्रमसंस्कार छावणी २०१० - वृत्तांत

' चंगळवादाकडे झुकलेली, सामाजिक भान हरपत चाललेली '... सध्याच्या तरुणाईबद्दल असा एक सर्वसाधारण समज पसरलेला बरेचदा आढळतो. याला छेद देणारा एक सुखद धक्का नुकताच अनुभवायला मिळाला - श्रमसंस्कार छावणीच्या रुपानं.

स्व. बाबा आमटे यांनी युवाशक्तीला प्रेरणा देण्याच्या उद्देशाने १९६७ सालापासून "श्रमसंस्कार छावणी" आयोजित करण्यास सुरुवात केली. श्रमाला प्रतिष्ठा देणारा हा उपक्रम पुढे जणू सामाजिक कार्यकर्त्यांचे उगमस्थान ठरला. येथून प्रेरित होऊन गेलेल्या अनेकांनी पुढे विविध सामाजिक क्षेत्रात भरीव काम केले. गेली ४२ वर्षे बाबांच्या सोमनाथ येथील प्रकल्पावर होणारे हे शिबिर यंदा प्रथमच हेमलकसा येथे आयोजित करण्यात आले होते. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश व डॉ. मंदा आमटे यांच्या समर्पित सहजीवनाची कर्मभूमी म्हणून हेमलकसा सर्वत्र सुपरिचित आहे. तेथील लोक बिरादरी प्रकल्पामध्ये १५ ते २२ मे या कालावधीत हे शिबिर संपन्न झाले.

भामरागडचा अति दुर्गम असा जंगल भाग, काहीसा संवेदनशील. त्यातच अतिशय कडक उन्हाळा, विजेचे भारनियमन.. अश्या प्रतिकुल परिस्थितीमुळे शिबिरार्थींच्या प्रतिसादाबाबत शंका व्यक्त होत होती. परंतु केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातल्या विविध भागातून आलेल्या शिबिरार्थींनी अतिशय उत्साहाने श्रमदानामध्ये सहभागी होऊन सर्व शंका खोट्या ठरविल्या. अर्थात केवळ श्रमाचे महत्व पटवण्यापुरताच या शिबिराचा हेतू मर्यादित नव्हता. इंडिया आणि भारत असे दोन वेगळे देश आपल्या एकाच देशात आहेत की काय असा प्रश्न पडावा इतकी टोकाची विषमता आज आपण अनुभवत आहोत. पण हे चित्र पालटवण्याची क्षमता असलेल्या तरूणाईला या वास्तवाची जाण व्हावी असा हेतू यामागे होता. त्यादृष्टीने श्रमदानाबरोबरच प्रत्यक्ष समाजोपयोगी काम करणाऱ्यांचे अनुभवकथन, गटचर्चा असे उपक्रम होते. हेमलकसा व परिसर म्हणजे देशातील अति मागास आदिवासींपैकी एक अश्या माडिया-गोंड आदिवासींचे वसतीस्थान. त्यांचे जीवन बाहेरच्या प्रगत भागातून आलेल्यांनी पहावे, त्यांचे प्रश्न समजावून घ्यावेत, आमटे दांपत्याने त्यांच्यासाठी केलेले काम पहावे, जमल्यास त्यातून काही प्रेरणा घेऊन आपापल्या गावी विधायक काम सुरु करावं असाही विचार होता.

ही सगळी उद्दीष्टे डोळ्यासमोर ठेवून आयोजकांनी शिबिराची आखणी केली. दुपारच्या कडक उन्हामुळे श्रमदानास पहाटेच सुरुवात होत असे.

भविष्यातील पाण्याच्या तरतुदीसाठी लोक बिरादरी प्रकल्पामधील तलावाचे विस्तारीकरण हे एक मुख्य काम होते. त्यासाठी सध्याच्या तलावाची खोदाई करुन पाणीसाठ्याची क्षमता वाढविणे तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठीच्या नियोजित फळबागेसाठी वाफे तयार करणे, परिसर स्वच्छता इ. कामांबरोबरच महत्वाचे काम होते ते शोषखड्डे तयार करण्याचे. प्रकल्पाच्या आजबाजुच्या ५ गावांमधील हातपंपासमोर हे खड्डे करायचे होते. एरवी या हातपंपासमोरच्या खोलगट जागेमध्ये सांडपाणी साठते. डासांच्या उत्पत्तीस व पर्यायाने रोगराईस कारणीभूत ठरणाऱ्या या सांडपाण्याचा निचरा तर या शोषखड्ड्यांद्वारा होतोच त्याचबरोबर कचरा गाळून जमिनीत मुरणाऱ्या पाण्यामुळे भूजल पातळी वाढण्यासही मदत होते.

या श्रमदानाबरोबरच स्वयंपाकाच्या पूर्वतयारीमध्ये मदत व जेवण वाढणे इ. कामेही शिबिरार्थी करत. या सर्व कामांसाठी शिबिरार्थींचे गट तयार केले होते. त्यानुसार आळीपाळीने सर्व कामे केली जात.

या सर्व कामाचे नियोजन, शिबिराची पूर्वतयारी तसेच शिबिरार्थींच्या व्यवस्थेसाठी आनंदवनातील काही कार्यकर्ते तसेच लोक बिरादरी आश्रमशाळेतील शिक्षक व काही विद्यार्थी यांनी अतोनात मेहनत घेतली.

देशभक्तीपर, "भारत जोडो" च्या गीतांच्या व घोषणांच्या स्फूर्तीदायक वातावरणामध्ये काम झाल्यावर जेवण व विश्रांती. त्यानंतर दुपारच्या सत्रामध्ये व्याख्यान / अनुभवकथन / गटचर्चा. संध्याकाळी मोकळा वेळ व रात्रीच्या जेवणानंतर मनोरंजनाचे कार्यक्रम असा भरगच्च दिनक्रम असे.

शिबिराचा शुभारंभ ध्वजवंदनाने झाला. त्यानंतर डॉ. प्रकाश आमटे यांनी आशीर्वादपर भाषण केले. त्यांनी शिबिरार्थींचे स्वागत केले तसेच प्रतिकुल हवामानामध्ये इतक्या दुरुन आल्याबद्दल अभिनंदन केले. भाषणाची सवय व आवड नसल्यामुळे त्याऐवेजी शिबिरार्थींच्या गटांशी अनौपचारिक गप्पा मारण्याचा त्यांचा विचार सर्वांनाच आवडला. प्रथमदर्शनीच त्यांचा निगर्वी साधेपणा सगळ्यांना जाणवला.

सकाळी झालेल्या श्रमदानानंतर दुपारच्या सत्रामध्ये प्रथम शिबिरार्थींची ओळख करून घेण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर माजी प्राचार्य व बाबांच्या "भारत जोडो" च्या चळवळीतील प्रारंभापासूनचे कार्यकर्ते सोमनाथजी रोडे यांनी शिबिरामागची भूमिका विशद केली.

संध्याकाळी बाबा आमटे, डॉ. प्रकाश व डॉ. मंदा आमटे यांच्या कार्याची तसेच भारत जोडो चळवळीबद्दल माहिती देणारे माहितीपट दाखवण्यात आले.

दुसऱ्या दिवशी 'नूतनक्षम उर्जा स्त्रोत' या विषयावर डॉ. प्रियदर्शिनी कर्वे यांचे व्याख्यान झाले. त्यांच्या Appropriate Rural Technology - ARTI अर्थात 'आरती' या संस्थेतील उर्जाविषयक उपकरणांना मानाचा 'अॅश्डेन' पुरस्कार विक्रमी दोन वेळा प्राप्त झाला आहे.

वेगवेगळ्या प्रकारच्या सुधारित चुली, आधुनिक बायोगॅस संयंत्रे आदी विविध उपकरणे 'आरती' मध्ये तयार होतात. ग्रामीण भागातील जनतेला परवडतील, स्वयंपाकघर प्रदुषणमुक्त ठेवतील अशी शास्त्रशुद्ध व आधुनिक पद्धतीने केलेली उपकरणे स्त्रियांचे आरोग्यमान तर उंचावतीलच त्याचबरोबर त्यांच्या खरेदी-विक्रीतून तेथील रोजगारालाही चालना देतील असा विश्वास डॉ. कर्वे यांनी यावेळी व्यक्त केला. त्यांच्या संस्थेच्या इतर संशोधनाविषयी माहितीही सादरीकरणाद्वारे त्यांनी दिली. प्रश्नोत्तरे होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

संध्याकाळी संजय साळुंके यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

तिसरा दिवस बाबा आमटे यांच्या विविध प्रकल्पावर काम करत असलेल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवकथनाचा होता.

१९८४ नंतरच्या देशातील परिस्थितीमुळे अस्वस्थ होऊन बाबांनी देशाच्या एकात्मतेसाठी 'भारत जोडो' यात्रा काढली. या उपक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली. त्यावेळेच्या स्फोटक परिस्थितीचे, यात्रेच्या परिणामाचे विलक्षण असे अनुभव त्यांच्याबरोबर चळवळीमध्ये सहभागी झालेल्या त्यांच्या सहकाऱ्यांनी कथन केले.

त्यानंतर इतर प्रकल्पावर सुरुवातीपासून सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनी आपला जीवनप्रवास शिबिरार्थींसमोर रेखाटला. यामध्ये हेमलकसा येथील बेस कँप समजला जाणाऱ्या नागेपल्ली प्रकल्पातील जगन मचकले, सोमनाथ प्रकल्पाचे हरीभाऊ बढे, आनंदवनातील सुधाकर कडू आदींचा समावेश होता. या सच्च्या अनुभवांना, त्य़ातील जीवन संघर्षाला श्रोत्यांनी मनापासून सलाम केला. कार्यक्रमानंतरचा बराच वेळ चालू राहिलेला टाळ्यांचा कडकडाट हाच आदर आणि कौतुक व्यक्त करत होता.

चौथ्या दिवशी, मंगळवारी दि. १८ मे रोजी डॉ. विकास आमटे यांचे व्याखान झाले. आपल्या अकृत्रिम, नर्मविनोदी शैलीमधून त्यांनी बाबांच्या जीवनप्रवासाची कहाणी सांगितली.

यानंतर 'सध्याची शिक्षण प्रणाली आणि विद्यार्थी आत्महत्या' या विषयावर शिबिरार्थींमध्ये गटचर्चा झाली. समारोप माजी प्राचार्य अनिल हूड यांच्या व्याख्यानाने झाला. शिक्षणव्यवस्था विद्यार्थीकेंद्रित होण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. संध्याकाळी विसुभाऊ बापट यांच्या 'कुटुंब रंगलंय काव्यात' या मराठी काव्याच्या विक्रमवीर कार्यक्रमाला श्रोत्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

दि. १९ मे रोजी "छोटी राज्ये आणि विकास" या विषयावर गटचर्चा झाली. त्यानंतर देवाजी तोफा यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम झाला.
श्री. तोफा यांनी गडचिरोली जिल्ह्यातील 'लेखामेंढा' या गावी राबवलेल्या 'आमच्या गावात आम्हीच सरकार' या यशस्वी प्रयोगाबद्दल माहिती दिली. गांधीजींच्या ग्राम स्वराज्याची संकल्पना या प्रयोगातून साकार झाली आहे. ग्रामसभेला सर्वोच्च स्थान, संपूर्ण गावाचा प्रत्येक निर्णयप्रक्रियेमध्ये सहभाग, सामूहिक नेतृत्व आदि विविध वैशिष्ट्यांमुळे आदिवासी समाजाचे होणारे शोषण थांबवून विकासाला गती प्राप्त होते असे मत यावेळी श्री. तोफा यांनी व्यक्त केले.
एक अल्पशिक्षित आदिवासी आपल्या विचारांतून, कृतीतून केवढे परिवर्तन घडवू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण यानिमित्ताने शिबिरार्थींसमोर आले.
संध्याकाळी आनंदवनातील अंध-अपंग यांच्या 'स्वरानंदवन' या वाद्यवृंदाला जोरदार प्रतिसाद मिळाला. प्रारंभी डॉ. भारती आमटे यांनी या अभिनव प्रयोगामागची संकल्पना स्पष्ट केली. अंध-अपंग, कुष्ठरोगी यांच्या या शानदार वाद्यवृंदाने हे सर्व गुणवत्ता, सादरीकरण यात कुठेच कमी नसल्याचे दाखवून दिले.
या जल्लोषात आपला आवाज श्रोत्यांना ऐकवण्याचा मोह डॉ. विकास यांनाही आवरला नाही. त्यांनी सादर केलेल्या गझलांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

दि. २० मे रोजी सांगली येथील सतीश गायकवाड यांचे जैवविविधता या विषयावर व्याख्यान झाले. शेती करताना काही भागावर तरी पारंपारिक वाणाची लागवड करून जैवविविधता टिकवण्यात शेतकऱ्यांनी हातभार लावावा असे आवाहन त्यांनी केले.

गुरुवारी दि. २१ रोजी झालेले श्री. गिरिश कुलकर्णी यांचे अनुभवकथन हा शिबिरार्थींना मार्ग दाखवणारा वस्तुपाठच होता. अशाच एका श्रमछावणीमधून प्रेरणा घेऊन नगरला परतलेल्या श्री. कुलकर्णींना वेश्यांची व त्यांच्या मुलांची भयानक अवस्था अस्वस्थ करत होती. त्यातून त्यांनी सुरु केलेल्या छोट्या कामाचा आज त्यांच्या 'स्नेहालय' या संस्थेच्या रुपाने झालेला विस्तार, पूर्वानुभव व आर्थिक पाठबळाच्या अभावी अतिशय अडचणींतून मार्ग काढतानाचे त्यांचे अनुभव, जाता जाता सहज दिलेले कानमंत्र यामुळे हे प्रांजळ आत्मकथन अतिशय प्रभावी ठरले.

शिबिराच्या पूर्वसंध्येला काही शिबिरार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले. अनेकांनी या प्रकल्पामुळे भारावून गेल्याचे व या शिबिरातून खूप काही शिकायला मिळाल्याचे सांगितले. तोच धागा पकडून संयोजक श्री. अनिकेत आमटे यांनी समारोपाच्या भाषणात ही प्रेरणा कायम ठेवण्याचे आवाहन केले. त्यासाठी एखाद्या सामाजिक संस्थेतच काम केले पाहिजे असे नाही तर वैयक्तिक पातळीवर एखाद्या गरजूला केलेली मदतही त्यासाठी उत्तम सुरुवात ठरू शकते. अशी एखाद्या शिबिरार्थीने केलेली सुरुवातही शिबिराचे यशस्वी फलित ठरेल असे ते म्हणाले.

२२ तारखेला ध्वज उतरवून या शिबिराची सांगता झाली. निरोप घेताना पुनःपुन्हा इथे येण्याचे व काम करत राहण्याचे शिबिरार्थींनी दिलेले उत्स्फुर्त आश्वासन त्यांच्या लोक बिरादरी प्रकल्पाशी जुळलेल्या नात्याची ग्वाही देत होते.